४) पेटीचे स्थलांतरण करतेवेळी पेटी पुर्ण पणे बंद करून ठेवावी.

५) पेटीचे स्थलांतरण रात्रीच्या वेळीच करावे.

मधमक्षीकापालन करतेवेळी घ्यावयाची दक्षता

१) पेटी साफ करतेवेळी समतल ठिकाणी ठेवावी.

२) पेटीच्या समोरील भाग पुर्वेकडे ठेवावा.

३) पेटीची नियमत देखरेख करावी.

४) मधु निष्कासन यंत्र मच्छरदाणित गुंडाळून किंवा रूममध्ये ठेवावे.

५) मध काढतेवेळी पोळ्यावरून माशा काढून घ्याव्यात.

६) पेटीतून पोळयाची चौकट काढतेवेळी राणी माशीला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

७) पोळ्याला सुरीने शिलून काढावे.

८) पोळे काढल्यावर ते मधु निष्कासन यंत्रात ठेवावे.

९) मधू निष्कासन यंत्राला हळूवार फिरवावे.

१०) मध काढल्यानंतर पोळे जेथून काढले तेथेच ठेवावे.

११) पोळ्यातून वेळोवेळी मेण काढत रहावे.

१२) प्रोपोलीज चे संग्रह वेळोवेळी करावा.

१३) शक्य असल्यास बी-व्हेनम चा संग्रह करावा.

मधू संशोधन

१) अनावश्यक तत्व जसे मधमाशी, मेन व इतर वस्तुंना मधातून काढून टाकाव्यात.

२) मधातील तापमान मोजावे जर तापमान जास्त असल्यास ते कमी करावे.

३) मधाला प्रोसेसिंग प्लॉन्ट मध्ये साफ करून ते स्वच्छ बाटलीत भरून ठेवावे.

मधाचा व्यवसाय

१) मधाच्या व्यवसायाकरीता आवश्यकतेनुसार अलग-अलग मापाच्या बॉटलमध्ये साठवून ठेवावे व त्याची विक्री करावी.

२) मधमाशांना त्यांच्या शत्रुपासून वाचवावे. उदा. मुंग्या, उधई, पाली इ.

३) मधमाशांच्या वसाहतीची काळजी घ्यावी जेणेकरून त्या कोणत्याही आजारास बळी पडणार नाही.

४) पेटीतील सफाई करतेवेळी हात मोजे व बी-व्हेल वापरावे.

५) मजबूत कॉलनीचे उचीत वेळी विभाजन करावे व आवश्यकता भासल्यास स्थानांतरीत करावे.

६) अन्न व पाणी वेळो-वेळी व आवश्यकतेनुसार विशेषत: विपरीत वातावरण असतांना उपलब्ध करावे.

७) उष्णता व पावसापासून रक्षण करावे.

८) मधमाशाच्या पेटीजवळ कोणतेही किटकनाशक फवारू वा वापरू नये.

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत मधमाशी पालन

राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत मधमाशी पालनासाठी अनुदान उपलब्ध असुन मधमाशी पालन व्यवसायाची सुरवात करण्यासाठी पेटी खरेदीसाठी आणि खरेदी साठी अनुदान मिळू शकते त्यासाठी संबधीत तालुका कृषि अधिकारी यांचेकडे संपर्क करावा.



घडीपत्रिका : डॉ. पंदेकृवि/प्रका/१६५६/२०२५

मधुमक्षीका पालन
(एक उत्तम शेती जोडधंदा)



डॉ. किशोर की. झाडे
प्रा. पुष्पक बोथीकर
डॉ. प्रितम चिरडे
डॉ. विक्रम कदम

कृषि विज्ञान केंद्र,
सोनापूर-गडचिरोली
टोल फ्री क्र. १८०० २३३ ३३२३३
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३०१७
Email – kvksonapur@gmail.com
Website – www.kvkgadchiroli.in

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

मधुमक्षीका पालन एक यशस्वी व्यवसाय

आपल्या देशात मुळरूपाने पाच प्रकारच्या मधमाशा आढळतात. एपिस डॉरसॅटा, एपिस सेरेना इन्डीका, एपिस मेलीफेरा (युरोपीयन मधमाशी), एपीस फ्लोरीया तसेच एपीस मेलीपोना आपल्या देशात पाळल्या जातात. सर्वात जास्त उत्पादन देणाऱ्या मधमाशांमध्ये प्रथम क्रमांक एपिस डॉरसॅटा याचा येतो. हि मधमाशी आकाराने बाकी मधमाशांपेक्षा मोठी असते. वर्षाला ५० ते ६० किलो मध एका पोळ्यातून प्राप्त होवू शकते परंतू रागीट व चंचल स्वभावामुळे त्यांना पाळणे अशक्य होते.

एपीस सेरेना इन्डीका एका वर्षात साधारणत: २०-२५ किलो ग्रॅम मध एका पोळ्यामधून देते. तसेच एपिस मेलीफेरा नावाच्या मधमाशा इटली मधून आपल्या देशात पालनाकरीता आणल्या. ह्या मधमाशापासून ४०-४५ कि.ग्रॅम मध प्रति पोळं प्रति वर्ष उत्पादन घेता येते. आपल्या कडील वातावरणाच्या तफावतीमुळे त्यांच्या उत्पादनात फरक पडतो. ह्या दोन्ही प्रकारच्या मधमाशा घरगुती व शांत स्वभावाच्या असल्यामुळे त्या पाळल्या जातात.

एपिस लोरीया व एपिस मेलीपोना ह्या मधमाशा जंगलातील झुडपात राहतात. त्यांचा स्वभाव शांत आहे. परंतु उत्पादन नगन्य असल्यामुळे त्याचं पालन करणे सोईस्कर होत नाही. त्यांचे वार्षीक मधाचे उत्पन्न फुलोऱ्याच्या उपलब्धतेनुसार २५० ग्रॅम ते २ किलो पर्यंतच असते.

एका पोळ्यामध्ये कमीत-कमी १०-१५ हजार मधमाशा असतात. तसेच मधमाशाच्या एका वसाहतीमध्ये केवळ एकच राणीमाशी, ५००-६०० नर माशा (ड्रोन) व उर्वरीत कामकरी माशा असतात.

मधमाशा पालनामुळे आपल्याला मेन, मध, प्रोपोलीज, रॉयल जेली, बी-व्हेनम इत्यादी पदार्थ मिळतात. कृषिक्षेत्रात या मधमाशांची खूप मोठी भुमिका आहे. शेतीच्या उत्पादनात ८५ % परागकणांचा प्रसार किटकांमार्फत होते. ज्यामध्ये मधमाशी प्रमुख आहे. निरीक्षणामध्ये असे आढळले आहे की, परिसरात मधमाशा असतांना परागीकरणामुळे उत्पादनात अधिक वाढ होते. बहुतेक शेतकऱ्यांचे गैरसमज असतो की, मधमाशामुळे शेतातील पीकाचे नुकसान होते. परंतू हळू-हळू हा गैरसमज निवळत आहे. बेरोजगार, घरगुती महीला यासाठी हा व्यवसाय आता वरदान ठरत आहे. गडचिरोली सारख्या वनव्याप्त क्षेत्रात तसेच आजुबाजूच्या परीसरात भरपूर प्रमाणात फुल झाडे आढळतात. या ठिकाणी मधुमक्षीकापालन हा फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो. ज्या ठिकाणी आपल्याला हा व्यवसाय सुरू करायचा आहे तेथे जागेचे निरीक्षण करणे अत्यावश्यक आहे. तसेच मधुमक्षीका पालनाकरीता बी-फ्लोरा कॅलेंडर उपयुक्त आहे. मधुमक्षीका पालनाकरीता सर्वप्रथम शास्त्रोक्त माहीती असणे आवश्यक असते. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण व माहीती कृषि विज्ञान केंद्र, सोनापूर-गडचिरोली येथे उपलब्ध आहे तसेच महाराष्ट्रात यासंबधी माहीती व प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ तसेच केंद्रिय मधमाशीपालन व संशोधन संस्था, पुणे या संस्थेव्दारे व इतर संलग्न विभागाव्दारे दिल्या जाते.

सुरूवातीला जास्तीत-जास्त १० मधमाशांच्या पेटयापासून मधमाशी पालनाला सुरूवात करावी. यादरम्यान हळू-हळू त्यातील येणारे लहान-सहान अडथळे व त्यांची पालनाची प्रणाली शिकून घ्यावी. एक यशस्वी व्यावसायीक बनविण्यासाठी या बाबींचा अभ्यास असणे आवश्यक आहे. नंतर हळू-हळू त्यातूनच वसाहत विभाजन करून मधूमक्षिका पालनाचा विस्तार करावा.

एका पेटीपासून कमीत-कमी २० किलो मध उत्पादन करणारा व्यक्ती वार्षीक ५० रू. किलो या हिशोबाने १००० रू. प्राप्त करू शकतो. सोबतच जसे-जसे व्यवसायात वाढ होत गेली तसे-तसे दुप्पट-तिप्पट उत्पादन होऊन आपले उत्पन्न वाढवू शकतो

मधुमक्षीका पालनाच्या आवश्यक गरजा

१) मधुमक्षीका पालनाकरीता आवश्यक असलेली सामुग्री

२) मधुमक्षीका पालनाकरीता आवश्यक व चांगल्या जागेची निवड

३) मधुमक्षीका पालनाकरीता मधमाशांची वसाहत तसेच प्रजातीची निवड

४) मधुमक्षीका पालनाकरीता आवश्यक वेळ

५) मध तसेच इतर उत्पादनाचा संग्रह

६) मधाचे संशोधन

७) मध बाजारात विकणे.

मधुमक्षीका पालनासाठी आवश्यक सामुग्री

१) मधुमक्षीका पेटी
२) हाईव्ह टूल्स
३) बि व्हेल
४) मेन छीलन्याकरीता सुरी
५) मध माशा
६) मेन सिट
७) मधुनिष्कासन यंत्र
८) स्मोकर
९) हातोडी
१०) बकेट
११) हातात घालायचे हात मोजे

मधुमक्षीका पालनाकरीता आवश्यक ठिकाण

१) फुलझाडाच्या परीसराच्या जवळ मधमाशाची पेटी असावी.

२) मधुमक्षीका पालनाच्या परीसरात स्वच्छ पाण्याची उपलब्धता असावी.

३) मधुमक्षीका पालनाचा परीसर स्वच्छ, प्रसन्न व तणविरहीत असावा.

४) मधुमक्षीका पालनाच्या परीसरात मधमाशांना फिरतांना अडचण होऊ नये याची काळजी घ्यावी.

५) मधुमक्षिका पालनाची पेटी अशा ठिकाणी ठेवावी की, जेथे सकाळचे सुर्यकिरण पेटीवर पडतील.

६) मधुमक्षीका पेटी लोकांच्या गर्दीच्या ठिकांणापासून व कर्कश आवाजापासून दूर ठेवावे.

मधुमक्षीकापालनाकरीता मधमाशांचा संग्रह तसेच त्यांच्या प्रजातीची निवड

१) ज्या क्षेत्रात मधमाशा पाळायच्या आहेत अशाच भागातील मधमाशाची निवड करावी.

२) मधमाशी पालनाची जागा मधमाशा संग्रहापासून कमीत-कमी ३ किमी. दूर असावी.

३) ज्या मधमाशांच्या कॉलनीमध्ये उत्तम प्रकारचे मध, पराग, अंडे , त्यांचे पिल्ले व मधमाशा असतील त्यांचीच निवड करावी.